Rotary Club Of Pune Metro R.I. District 3131 Club No.31769

# METROPOLITAN

President : Rtn Vivek Kulkarni Hon. Secretary : Rtn Girish Ranade Editor : Ann Vaidehi Jog

SEPTEMBER 17 2022 https://rotarypunemetro.com Issue 4

## CONTENTS

1. अण्णा उवाच
2. जनरेशन अल्फा
3. आनंदी जगण्याचे शास्त्र
4. युथ फोरम
5. क्लब प्रोग्रॅम
6. बाप्पा मोरया
7. रसग्रहण
8. मशागत
9. रोटरी इंटरनॅशनल

## WRITERS

1. Rahul Joshi
2. Pradnya Gokhale
3. Narendra Dravid
4. Snehal Erande
5. Seema Deshpande
6. Ashwini Joshi
7. Snehlata Chatre
8. Vaidehi Jog



### कार्यक्रम

18 सप्टेंबर - पिकनिक

29 सप्टेंबर- स्वर्गीय लताबाईंच्या आठवणी !

'स्मरणयात्री ' सुप्रसिद्ध लेखक श्री.प्रवीण जोशी आणि सुप्रसिद्ध सूत्रसंचालक ,निवेदक श्री.अरुण नूलकर .

१३ ऑक्टोबर सुप्रसिध्द अभिनेत्री शुभांगी दामले यांचीमुलाखत घेणार आहेरो. राजा उत्तुरकर

१६ ऑक्टोबर दिवाळी सेलीब्रेशन 'कजरा मुहोब्बत वाला'

**October Metro stars, Ashwini**

Rajendra- Arusha Majali, Amit- Shilpa Apte, Anand- Anuradha Puntambekar, Sunil- Anagha Gokhale, Manasi- Milind Kulkarni






## *PRESIDENTIAL*




Congratulations Dr Anoushka for prestigious PhD.

RCPM Durga project started. Few glimpses of the opening ceremony today at Panditrao Agashe School. This project will continue for 3 months, and the basic self-defense techniques will be taught to the girls.

Last month, Rotary Club of Pune Metro had Project focused zoom meeting and the Special Project Bulletin. They enabled us to connect with our traveling members as well as well-wishers. It was unique idea, well implemented and highly appreciated. Thank you all for making it success.

We continued our tradition of RCPM Family members' gathering for Ganapati Aarti and Traditional Prasad in Member's house. Chatting (reminiscing past events, members) at home, was the best part to cherish.

We have received very good registration response for RCPM's Day out on 18th Sept at Wai. It is going to be a great club assimilation activity. Looking forward to charging our batteries with Fun, Frolic.

Program committee, monthly teams, fellowship teams are taking lots of efforts to give all of us interesting, well thought out meeting experiences. Let us attend these meetings in large numbers and cheer them up.

We completed our longest running WEDP project, perfectly as planned. Interactions with attendees reassured us of the continued community need and well alignment of our approach.

Project Durga (Self-defense techniques coupled with extensive practical sessions in person for school Girls) was kicked off on 12th Sept. Formal inauguration will happen during Navaratri. Project Manovedh, addressing psychologies issues (due to social/cultural/economical gaps) faced by rural students moving to city for college education, is also set to begin from Sept 26th.

Both these projects are transformational and will be done over next 3-4 months structured in such a way that we will have new practical sessions building on top of past sessions. Attending these sessions with beneficiaries would be highly beneficial for all our members also. 'Read a Story' is one such unique technology enabled project. Project serves the real community need with direct connect between our volunteers and student beneficiaries from Rural/Tribal areas, via phone. It is very heartening to see substantial number of our very young and senior family members participating as volunteers. The project is also giving them common topic/interest, bringing them closer and closing the generation gap within family. **I am sure with these new types of projects and activities, RCPM will be a Polestar in Rotary Sky**.

Let us all connect with our to BOD Members/Convenors, more often, to understand RCPM's Avenue plans, Constraints, Project/Activity Status ,join the respective teams during idea conceptualization stage and add value, work on reducing constraints(if any) and/or further improving execution , take full ownership around implementing your ideas/suggestions, some necessary tasks, cheer them up ( or get recognized/cheered by fellow members) for the work being done for all of us Members' appreciation, active support for the work that we all are doing for RCPM/Beneficiaries is THE ONLY fuel driving all of us.

**Let us all ensure that RCPM Fuel tank is always full.** An appeal by President

*TRY NEW THINGS...BE A POLESTAR*



**अण्णा उवाच  (अण्णा राहुल)**

आशा

आपण सगळेच उद्याच्या आशेवरच जगत असतो. परिस्थिती जितकी बिकट, तितकी आशा मोठी असते. तिचंही काहीसं असं झालं. पसंत नसलेलं लग्न केल्यामुळं माहेरचे दुरावले. मग कुंकवाचा आधारच किडका निघाला. मुलांच्या चरितार्थासाठी अफाट शहरात काम तर मिळालंच पाहिजे. पण त्या कामाची कॉम्पिटिशन सुद्धा, स्वतःच्या सख्या मोठ्या बहिणी बरोबर होती. एका तरुण बाईवर ओढवलेली परिस्थिती, तिचा थोडासा आत्मविश्वासही खच्ची करुन टाकते. हो, ही आशाबाईंची कथा आहे. कमी बजेटची, छोट्या संगीतकाराची मिळतील ती गाणी त्यांनी गायली. सिनेमाची दुनिया ग्लॅमरची दुनिया आहे, वर जाण्यासाठी इथं एक ब्रेक मिळावा लागतो, म्हणजे अगदी टॉप नको, पण कुचंबत चाललेलं जीवन जरा सुरळीत चालावं इतका. त्यासाठी आशाही प्रयत्नात होती. ओ.पी. नय्यर यांच्यामुळे ब्रेक तर मिळाला. नय्यर तेंव्हा सर्वात जास्त पैसे घेणारे संगीतकार होते. आधी नय्यरांच्याकडे मुख्य गायिका होती गीतादत्त. पण नय्यर-आशा दोघांचे कॉम्बिनेशन इतके लोकप्रिय झाले, की नय्यरांच्या गाण्यातला गायिकेचा आवाज आशाबाईंचाच असणार हे ठरुनच गेलं होत. नय्यरनी पाठ फिरवल्यावर पुढे गीतादत्त एकदा नय्यरना म्हणाल्या, नय्यरसाब, आप तो हमें भूल ही गये. झगमगाटी सिनेमाची दुनिया, जे विकलं जातं, त्याच्याच मागे जात असते. एक काळ होता.. अपयशी म्हणून घरी परत जाणाऱ्या नय्यरना, गीतादत्तनेच संगीतकार म्हणून गुरुदत्तला सांगून, काम मिळवून दिल होत. त्यात यश मिळालं आणि गीतादत्त नय्यरांच्या बरोबर होत्या. पुढे नय्यर-आशा जोडी सिने संगीतात हिट झाली. लक्षात घ्या, हे यश आशाबाईंना बाय फ्लूक मिळालं नव्हतं. आशाबाईंना समजलं की इथं स्वतःची जागा तयार केल्या शिवाय आपण रेसमध्ये टिकू शकणार नाही. सवाल पापी पेट का था. मग त्यांनी मिळणाऱ्या गाण्यात आशाचा ठसा कसा उमटवता येईल हे पहिले. याचवेळी त्यांना भेटले ओ.पी. नय्यर. त्यांनाही त्यांचा हटके आणि यशस्वी संगीतकार हा खिताब उंच ठेवायचाच होता. यातूनच एक वेगळं हिंदी सिनेसंगीत बाहेर पडलं. पुढे नय्यरांशी बेबनाव झाल्यानंतर सुद्धा आशाबाई, लता जी गाणी गात नसे अशी गाणी, आशा स्टाईलने गायला लागल्या. कॅब्रे सॉंग आशाबाईंनी अजरामर केली आहेत. ही त्यांची स्पेशॅलिटीचं बनली होती. पण यातच अडकून न पडता, वेगळी गाणी गाऊन त्यांचं सोनं करायला सुरवात केली. मग सगळं जग म्हणू लागलं, की  लता जरी लता असली तरी आशाचा बाजच वेगळा आहे. आशा ही आशाच आहे. त्यामुळे _परदे  में रहने दो, परदा ना उठा ओ.  पासून मोनिका माय डार्लिंग..  पर्यंत सर्व प्रकारच्या गाण्यात आशा एकदम दिल को छू लेती है.. त्यांचं दिल चीज क्या है आप मेरी.. जसं आत्मीयतेनं ऐकता, तसं मोनिका ओ माय डार्लिंग.. ऐकून एकदम आपली सगळी संस्कृती बुडाली की काय? असं बघू नका, एव्हढच सांगणं..

## Education for Generation Alpha

Let me start with the schooling I received in a Convent school in Durgapur which was the only Girls school in the town and where we sat in cemetery rows in academically segregated classrooms, and sadly, things have not changed. In most schools, students are sitting, listening to the teacher, and too often, students are totally deflated, because the teacher is spending more time on classroom management than engaging them. Now I am back to school however in a more challenging role, i.e to mentor teachers who in turn will handle the 'Generation Alpha'.




Who are these generation Alpha learners? Typically, these are the students born between 2010 and 2025. These students and the generations ahead of them ... they are our talent pool for everything Today, my job is to guide educators to strategize for creating collaborative, learning environments grounded in equity, where students can actively participate in their own education, instead of memorizing for tests, where the curriculum is delivered in a way that supports the needs of our students. Much to our help is the new National Education policy which stresses on competency-based Education. So, taking the cues from NEP we have developed tools which help the students to be critical thinkers, problem solvers, ideates and leaders. We as a bunch of educators, have been able to build on interdisciplinary project-based teaching and learning.  This approach enables teachers to understand how each student learns, use multiple ways to assess their knowledge and then make instructional adjustments based on the results. However, the most daunting task is to urge all the educators to adapt to newer ways of teaching -learning and that would mean unlearn and then relearn for them.

**Rtn Pradnya Gokhale**

## आनंदी जीवनाचे साधे व सोपे शास्त्र

जीवन काय आहे हे आपण पाहू शकत नाही पण जीवनाचा परिणाम काय होतो ते मात्र आपण पाहू शकतो. जीवन असल्याने आपण श्वास घेऊ शकतो, विचार करु शकतो, बोलू शकतो, हालचाल व क्रिया करु शकतो.अगदी ह्याच प्रमाणे आपण विचार पाहू शकत नाही पण विचारांचा परिणाम पाहू शकतो. आपण कल्पना करू शकतो, विचार करु शकतो, विचारांमुळे भावना निर्माण होतात ते पाहातो आणि मग ह्या भावनाच आपल्याला क्रिया करायला भाग पाडतात. ह्याप्रमाणे आपला विचार प्रत्यक्षात येतो. जीवन खरेतर खुप सुंदर आहे आणि ते कसे जगायचे ह्याचे साधे व सोपे शास्त्र आहे पण ते मनुष्य शिकत नाही. त्यामुळे जीवन अवघड आहे, ते आजार, गोंधळ, दुःख, अडचणी, अव्यवस्था, अपयश इत्यादी गोष्टींनी भरलेले आहे असेच वाटते. पण जीवन आरोग्यपूर्ण, आनंदी, समृध्दीने भरलेले, सुखी, स्वास्थ्यदायक असू शकते ह्यावर आपला विश्वास कमी असतो. हे असे जीवन कसे मिळेल ह्याचे ज्ञान आपण मिळवायचा प्रयत्न करत नाही कारण जे आहे तेच माझे प्रारब्ध आहे, नशिब आहे असे आपण समजून चालतो.ही परमेश्वराची करणी आहे म्हणून मला ती भोगलीच पाहिजे असे आपल्याला वाटते. पण माझ्या जीवनात जे आले आहे त्याला मीच सर्वस्वी जबाबदार आहे हे मानवाच्या लक्षातच येत नाही. परमेश्वर नव्हे तर आपणच आपले जीवन कसे असावे हे ठरवत असतो. पण हे लक्षात न आल्याने आपण परमेश्वराला अथवा नशिबाला दोष देतो. मीच माझे कसे असे वाईट करेन असे वाटून आपण आपली जबाबदारी टाळतो. पाहा कसे आहे. माझे जीवन माझ्या विचारांमुळे घडते हे आपण शिकत नाही. हे साधे शास्त्र मानव शिकत नाही. त्यासाठी मानवाने आपले विचार कसे असतात व ते कोठून येतात हे पाहायला हवे. मानवाचे विचार हे त्यांच्या मनातून येतात, त्यांच्या जाणीवेतून येतात आणि ही जाणीव समाजाकडून येणार्या विचाराने तयार झालेली असते.

लहानपणापासून समाज आपल्या मनात अनेक नकारात्मक, अभावात्मक , कमतरतेचे, दुःखाचे, आजाराचे, अपयशाचे विचार भरत असते व ते आपण मान्य केलेले असतात. त्यामुळे मनुष्य हे विचार लगेचच धरुन ठेवतो व तेच त्याचा घात करतात. आता हे सर्व कसे बदलायचे हे शिकायला हवे. आपण हे विचार लगेचच बदलू शकत नाही पण नियमित ध्यान करण्याने अथवा जागरुकतेने विचार केल्यास काही दिवसांत विचार सकारात्मक होऊ शकतात. सतत आरोग्याचे, समृद्धीचे, यशाचे व आनंदाचे विचार करणे आणि तेच विचार धरुन ठेवणे हाच एकमेव मार्ग आहे. आपले विचार प्रत्यक्षात येतातच हाच जीवनाचा नियम आहे. म्हणून जाणीवपूर्वक आपले विचार बदला म्हणजे जीवन बदलेल हाच जीवनाचा संदेश आहे. हेच जीवनाचे साधे व सोपे शास्त्र आहे

**नरेंद्र द्रविड**

# Youth Forum

It was indeed an excellent session on Emotional Intelligence. Never realized how 100 minutes passed by. Hall packed with approx. 120+ YOUNG attendees, attending with full attention, responding continuously to speaker ... all on their own. ... rarely seen now a days. Energy, positive attitude of these folks is really infectious. I suggest, we all should attend these. EPIC/similar sessions just to recharge our batteries (not necessary for knowledge) Thanks Amit for the same. Also, thanks to our past youth directors, for doing wonderful orientation of these Rotractors. By the way is Saurabh Bhosale is just 26-year-old. Very dynamic, innovative lad from place near Satara. Yesterday was his 595th lecture. Epic 2.0 episode 1.
President Vivek Kulkarni after attending Epic 2.0




• On 24th August RCP Westend had a very successful International RYLA with RYE inbound students. Reportedly, this was a first of its kind RYLA with RYE students. 16 students from various countries attended. AGA Rtn Sneha Subhedar attended the RYLA.





Annete Gargi in summer youth camp Germany




Karuaan, expressed his desire to contribute to Rotary Club of Pune Metro's Youth activities and gave us his contribution. We from RCPM will match it and make the best use of the same in our Youth Activities. We were really touched by his gesture and would like to thank Karuaan for the same.







**Young at heart**

Big thanks and congratulations to PP Avinash and Ann Ashwini Joshi for their generous contribution of USD 1000 for the APF in year 22-23. PP Avinash & Ann Ashwini are Paul Harris Society member and has contributed significantly to the Rotary foundation. Now PP Avinash having PHF +6 status & Ashwini PHF +3 status.



**Congratulation Sneha For 3rd prize in Kavyasari**







Very happy to share that our RCPM Family Member Rtn Anand Devchakke received Prestigious RABINDRANATH TAGORE Literature Award Recognised by Govt.of India and DRDC , Associated with BANSTECIA, USA for valuable contribution in the field of Literature.



**Congratulations Dr Anoushka for prestigious PhD.**



Vedangi Mrs.Pune



Mayuri Atre as Raj Gayika in 'Sur Nava Dhyas Nava' show







RCPM Durga project started. Few glimpses of the opening ceremony at Panditrao Agashe School. This project will continue for 3 months, and the basic self-defense techniques will be taught to the girls.

# CLUB PROGRAMS

५ ऑगस्ट ला क्लबच्या "प्रकल्पा ची माहिती सांगणारी " विषेश मीटिंग झूम प्लॅटफॉर्म वर आयोजित केली होती. झूम वर मीटिंग असल्यामुळे परदेशात असलेले सभासद पण उपस्थित होते. तसेच आपल्या प्रकल्पात पार्टनर असणारे इतर रोटरी क्लबचे सदस्य सहभागी झाले होते. प्रथम प्रेसिडेंट विवेक ने त्याच्या खास शैलीत झालेल्या मागील आठवड्यात झालेल्या प्रोजेक्ट व मीटिंग चा आढावा घेतला. ते एक उत्तम सादरीकरण होते. त्या नंतर प्रोजेक्ट डायरेक्टर पी पी मकरंद याने सूत्रे हाती घेऊन तीन मोठ्या प्रकल्पांची संपूर्ण माहिती क्लब सभासदांना देण्यासाठी प्रकल्प समन्वयक यांना विनंती केली. प्रथम रो प्रज्ञा, पी पी मुकुंद, पी पी पद्मा यांनी रामकृष्ण मिशन यांच्या सहकार्याने करीत असणाऱ्या "curriculam of joy "या प्रकल्पाची पूर्ण भूमिका, नियोजन व अपेक्षा स्पष्ट केल्या. हा शिक्षण क्षेत्रातील उत्तम व उपयुक्त असा प्रकल्प ज्याची समाजात खरंच खुप गरज आहे व तो आपण करीत आहोत . जास्तीत जास्त सभासदांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. रोटेरियन नीलकंठ यांनी प्रोजेक्ट अनुबंध बद्दल संपूर्ण माहिती विस्ताराने दिली. त्यानंतर रो सुनील यांनी २०१६ पासून ज्या विभागात आपला क्लब काम करतो आहे व आता ग्लोबल ग्रँट च्या सहकार्याने " Phalode cluster watershed and Integrated Development" (२०२१ - २४) काम करणार आहेत, या प्रकल्पाची सविस्तर व उत्तम फोटो सहित PPT सादर केली. तसेच तेथील महिलांसाठी शिवणकला क्लास सुरू केला आहे. त्याचे पुढील नियोजन रो कविता हिने सांगितले. अतिशय उत्तम असे हे काम चालू आसून सभासदांनी त्यांच्या रुची व वेळेनुसार यात सहभागी व्हावे असे आवाहन पी पी मकरंद याने मीटिंग मध्ये केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या सर्वांगिण विकासाच्या या प्रकल्पात काम करणे नक्कीच समाधानाचे आहे.

Rtn Seema Deshpande

*FIRST PROJECT EDITION OF RCPM*


















I really started admiring following of your qualities:
- Perfect Planning
- Precise Instructions
- FULL ownership - Desire to successfully repeat and further raise level (of project/workshop) in new situation, with new RCPM team.

President Vivek Kulkarni on Ashwinitai.

WOMEN ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT PROGRAM

Empowering women is the need of the society and it is one of the thrust areas of Rotary. On August 26 & 27, 2022, a Training program was organised for 'Empowering women through Enterprise'. This workshop is one of the activities of our club under Vocational Service Avenue, which helps in training of Women of the under-privileged group of the society. Jagruti Seva Sanstha (an NGO) and IndSearch Management College (on Law College Road) supported this project. R/Ann. Prof. Ashwini Joshi coordinated the workshop. Rtn. Amita Nene actively participated throughout this workshop.

The workshop was inaugurated by Rtn. Vivek Kulkarni, President, Rotary Club of Pune Metro. He told them about our club activities. Rtn. Brig. Sunil Gokhale explained to the participants, the contribution of Rotary towards community service and vocational service in different areas. Rtns PP Avinash Joshi, PP Milind Ghaisas, Surekha Deshpande, Amita Nene, Prerana Joshi, Shobhana Paranjapye, D R Panchwagh, Anagha Gokhale, Radhika & Jayant Keskar also attended the inaugural session. The workshop sessions included the subjects like Basic Management and Entrepreneurship Concepts, Quality and Time management, Finance & Accounts writing, Marketing Concepts, Stress Management, and Bank Facilities for women. The 'Finance & Accounts writing' session was conducted by Rtn. PP. Padma Shahane, and 'Stress Management' session was conducted by Rtn. Amita Nene. Both these sessions were highly appreciated by participants. The session on 'Management and Entrepreneurial concepts' was conducted by Ann Prof. Ashwini Joshi.

The workshop concluded by distributing Participation Certificates to all participants at the hands of Dr. Sunita Joshi, Dean of IndSearch. Pres. Vivek Kulkarni graced the occasion and distributed few certificates also. Neha Tilgulkar was also present. **This is the consecutive Sixteenth year of our club to conduct such workshop.** This workshop has been very successful & satisfying to the participants.

by Ann Prof. Ashwini Joshi









**Rotarian of the month**

On 15th Sept business meeting there was a chatpati start by chatpati bhel and panipuri. Program started with usual business followed by Club admin Yogeshree's presentation about all happenings, update about upcoming programs, project director Makarand giving Project updates including projects completed or underway and Rotary being service sector he urged to participate in projects more. Project list and contact person are given below.

President Vivek went over how we are fulfilling strategies planned during planning time. How programs are also used to create diversity and fellowship diversity, effects in enhancing fellowship too. Also, all avenues like foundation, membership, Pi and bulletin are working hand in hand towards members collaboration. Looking forward to increase in members participation, join, meet. The discussion was taken further with ideas from Rotarians and first lady too .Rtn Chiraag was awarded Rotarian of the month courtsy Yolkshire .

- Project Durga – Self-defense coaching Classes for 200 girl students, contact Rtn Datta
- Manovedh – Counselling for rural students, contact Rtn Prerana
- Anubandh – cancer treatment project contact PP Neelakanth
- Project Gurudakhshina - Upgrading digital skills for School Teachers, contact Ann Radhika
- Asmita daughter empowerment for 1000 girls contact Rtn Shilpa
- Collaboration with deAsara Foundation, contact Rtn Rajendra Erande

## माझी शाळा - कवियत्री आहेत संजीवनी बोकील

**रसग्रहण**

शिक्षणाच्या आत्यंतिक ओढीने व्याकूळ झालेली छोटी मुलगी आपल्या आईशी संवाद साधते आहे , आईनी तिला अभ्यास कर म्हणून आमिष दाखवण्या ऐवजी तीच आईला वेगवेगळी आश्वासनं देते आहे .रोटरी मधे September हा literacy month धरला जातो. एका छोट्या मुलीची शिक्षणा बद्दल ओढ दाखवणारी कविता. वाचता वाचता आपल्याला अस्वस्थ करेल आणि आपल्या नकळत डोळ्यातून अश्रू ओघळलेले आपल्याला कळणारही नाही. स्नेहलता छत्रे



"The Sleeping Teacher / Le Maitre d'école endormi", 1831. Joseph Beaume (1796-1885), French painter. Oil on canvas.





**माझी शाळा**

माये गं माये, तोडू नगं माझी शाळा,
लई लई शिकून मोठं व्हायचय मला ।
परवा आमच्या बाई म्हणाल्या का न्हाई?
तुमची पोरगी डोक्याने लय बेश हाई,
तवा पासून एकच सपान पडतंय मला,
लई लई शिकून मोठं व्हायचय मला ।
बेबीताई देणार हायेत त्यांची बुकं
ह्यानंच पडतील बघ थोडंसं पैकं ,
पण एक नवं काम मिळणार आहे मला
माये गं माये नग तोडू माझी शाळा ।
फाटं उठन,रंग्या - मंग्याला बगन,
भाकरी बी भराभरा थापून टाकन ,
बकरीची घाण बी लोटून ,जाईल मी पाण्याला,
माये गं माये ,नग तोडू माझी शाळा ।
थोड्याशा बी खर्चात नाही पाडणार तुला ,
गणवेश फाटलाय पण चालेल मला,
रिबीन नग, दप्तर नग ,नग पैसेबी खायाला
माये गं माये ,नग तोडू माझी शाळा ।
मी जाणते ग तुझ्या काळजाची कळा,
पाच कच्ची बच्ची अन् दारुडा दादला,
पण मी हाय ना तुझ्यासंग दुख झेलाया,
माये गं माये , नग तोडू माझी शाळा।
अन् … माय ,
जवा लई शिकून नंबर काढीन पयला,
तवा तुजं डोळं भरून येतील ना घळाघळा,
त्यो आसरु माझ्या साठी असंल सोन्याचा गोळा ,
माये गं माये ,नग तोडू माझी शाळा,
नग तोडू माझी शाळा ॥

माझ्या बागेत दोन झाडे आहेत .एक गुलाबाचे आणि एक कडीपत्त्याचे. दोन्ही झाडांची वेळेवर छाटणी, खत, कीड लागल्यास फवारणी हे सारे केल्यामुळे दोन्ही झाडे व जोमाने वाढत आहेत. रस्त्याच्या पलीकडे एक झाड आहे जंगली म्हणाना .त्या झाडाला मात्र खत पाणी काही नाहीये अधून मधून पावसाचा पाणी मिळालं किंवा एखाद्या वेळेला पाऊस पडला तर मिळेल तेवढेच. त्या झाडाची वाढ थोडीशी खुरटल्यासारखे वाटते. हेच पोषक वातावरण खत, पाणी, कीटकांपासून संरक्षण मिळाले तर हे झाड सुद्धा अधिक पटीने वाढेल नाही का ? हीच गोष्ट आपल्या मुलांच्या बाबतीत खरी ठरते. आपल्या मुलांना सर्वार्थाने पोषक वातावरण हे त्याच्या शाळेतून घरातून आजूबाजूच्या परिसरातून मिळत असते. आपण इतकी चांगली शाळा, महागडे कपडे, महागडी खेळणी, महागडे मोबाईल सर्व काही चांगल्या दर्जाचे देऊन सुद्धा काही वेळा मुले रसरसून का येत नाहीत, याचे कारण असते जाणीवपूर्वक वेळेवर न केलेली मशागत, खत. म्हणजे जेव्हा एखाद्या मुलांमध्ये एखादी वाईट सवय वाढते आहे किंवा रुजते आहे असे दिसले की तातडीने त्याच्यावर इलाज करणे, म्हणजे कापणी आणि तोडणी,हे शब्द वा कृतीने नाही हा ! पण हळुवारपणे त्याच्या मुळाशी जाऊन ते वाईट सवयींचे तण काढून टाकण्यासाठी आणि त्या जागी चांगल्या सवयी रुजवणे यासाठी आपले लक्ष असायला हवे .नुसते लक्ष ठेवून नाही, तर संवाद असायला हवा, मुलाला जाणून घ्यायला हवे .जेव्हा पण मुलाला जाणून घेऊ संवाद ठेवू तेव्हा मुलाचे बहरणारे कौशल्य लक्षात येतात. एक मुलगा होता तो एकटा राहत असे. मित्र नव्हते त्याला. त्याच्या आई-वडिलांना ते खूपच चुकीचे वाटत होते. एकदा त्याचे निरीक्षण करताना त्याच्या आईच्या लक्षात आले की तो एकटा जरी असला तरी रस्त्यावरच्या किंवा आजूबाजूच्या प्राण्यांना, जखमी झालेल्या पक्षांना पाणी ठेवायचा .त्याला विचारले "अरे पाणी का ठेवतोस तर तो म्हणाला आता उन्हाळा खूप वाढला आहे ना म्हणून पाणी ठेवतो". मग त्याला त्याच्या बरोबर बसून घरटी बनवायला मदत केली .त्यात खाण आणि पाणी ठेवून तो तासंतास त्यात रमलेला असतो. मग त्याला हळू हळू पुढचे खाद्य द्यायचे. पक्षांचे निरीक्षण करायला शिकवले, त्यांच्या नोंदी ठेवायला शिकवल्या.आता एखादी गोष्ट करायची तर त्यात मुलांनी नैपुण्य मिळवले पाहिजे हाही एक अट्टाहास असतो. त्यापेक्षा आनंद घ्यायला शिकवा आपणही थांबून पाहू आणि पंचेंद्रियानी स्वाद घेऊया. आपल्या वातावरणाचा भाग झालाय घाईने मुल एक्स्पर्ट झाल पाहिजे हे म्हणजे एखाद्या झाडाला सतत खतच घालत राहणे आणि तरीसुद्धा ते झाड का करपतय याचा विचार करणे असं होईल. म्हणजे झाडाची काय किंवा मुलाची काय जोपासना करताना योग्य प्रमाणात, योग्य वेळेला आणि योग्य प्रकारे आणि योग्य तितकेच हवे शिवाय महत्त्वाचं त्यात सातत्य हे असायलाच हवे.मग तुमची पण बाग बहरेल .मग करणार ना निरीक्षण आणि परीक्षण मग मशागत ? Vaidehi Jog

***Girls' education***

***Drawdown ranking: 6***

***A woman with no schooling has four or five more children than a woman with 12 years of schooling, which means that educating girls will have a huge impact on population growth.***

***While the regions of the world with growing populations are often the ones with the lowest per capita carbon emissions, reducing fertility rates will still have massive benefits — not only for the planet but also in reducing intergenerational poverty. And, the Drawdown authors note, one study found that educating girls is the single most important factor in reducing vulnerability to natural disasters, which occur more frequently with the extreme weather events associated with climate change. In Bosnia-Herzegovina, about 90 percent of Roma women are illiterate and less than 15 percent of Roma children go to school, leaving them vulnerable to human trafficking, among other things. The Rotary clubs of Mostar, Bosnia and Herzegovina, and Denver, Colorado, partnered with a local non-profit on a global grant project that mentored 80 families with at-risk girls. Twenty students from the University of Bosnia volunteered as mentors, and 15 Roma girls enrolled in school as part of the effort. Organizers estimate that at least 1,000 parents, teachers, and girls in 20 communities learned about the importance of gender equality in education through printed materials and workshops.***

From Rotary international website